सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. १६ ऑक्टोबर २०१७.

## राज्यातील ३,६६६ ग्रामपंचायतींसाठी ८१ टक्के मतदानाचा प्राथमिक अंदाज

मुंबई, दि. १६: राज्यातील विविध १८ जिल्ह्यांमधील सुमारे ३ हजार ६६६ ग्रामपंचायतींसाठी प्राथमिक अंदाजानुसार आज सरासरी ८१ टक्के मतदान झाले. यात थेट सरपंचपद आणि सदस्यपदांसाठीच्या मतदानाचा समावेश होता, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार आज सुमारे ४ हजार ११९ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदान होणार होते; परंतु काही ग्रामपंचायतींच्या निवडणुका बिनविरोध झाल्या. त्याचबरोबर इतर विविध कारणांमुळे काही ग्रामपंचायतींच्या निवडणुका होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे आज सुमारे ३ हजार ६६६ ग्रामपंचायतींसाठी प्रत्यक्षात मतदान झाले. किरकोळ अपवाद वगळता सर्व ठिकाणी मतदान प्रक्रिया शांतता व सुरळीतपणे पार पडली. सर्व ठिकाणी उद्या (ता. १७) मतमोजणी होईल.

**आज प्रत्यक्ष मतदान झालेल्या ग्रामपंचायतींची जिल्हानिहाय संख्या अशी: ठाणे-** ३३, **पालघर-** ५०, **रायगड-** १६२, **रत्नागिरी-** १५४, **सिंधुदुर्ग-** २९३, **पुणे-** १६८, **सोलापूर-** १८१, **सातारा-** २५६, **सांगाली-** ४२५, **कोल्हापूर-** ४३५, **उस्मानाबाद-** १५८, **अमरावती-** २५०, **नागपूर-** २३७, **वर्धा-** ८६, **चंद्रपूर-** ५२, **भंडारा-** ३६१, **गोंदिया-** ३४१ आणि **गडचिरोली-** २४. **एकूण-** ३,६६६.

०-०-०

(Jagdish More, PRO, SEC)